**नादब्रह्माचे व परब्रह्माचे उपासक**

# कै. अंतुबुवा जोशी

अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - दैनिक लोकसत्ता वर्तमानपत्र, संपा. ह रा महाजनी, मुंबई, १७ सप्टेंबर, १९६७)

बाकीचे सारे ग्रंथ समग्र वाचता येतात व वाचून समजतात. पण माणूस या ग्रंथाविषयी मात्र असे काही ठामपणे सांगता येत नाही. या ग्रंथातील काही पाने, काही घटना व प्रसंग एवढेच आपल्याला समजतात. लक्षात राहतात. फुटकळ आठवणींशिवाय हाती काही राहत नाही.

पण म्हणूनच आठवणींचे महत्त्वही अपार. व्यक्तीच्या विविध पैलूंचे दर्शन आठवणींतून सहजासहजी होते आणि ते अनेकदा मनाचा ठाव घेणारेही असते. अंतुबुवांना गुरू, गवई, व्यक्ती या तिन्ही नात्यांनी जवळून पाहण्याचा मला योग आला. आणि बाबांना (हे त्यांचे घरगुती नाव) जाणू शकलो असे म्हणणे धाडसाचे असले तरी त्यांचे व्यक्तिमत्व संपन्न आहे याची मात्र साधार जाणीव झाली हे खरेच.

१९४७ साली बाबांना त्यांच्या सांगीतिक विजनवासातून खेचून आणले तेव्हा त्यांचा मुंबई आकाशवाणीवर पहिला कार्यक्रम झाला. बाबा सकाळी जौनपुरी खूप जमून गायले. आणि गाणे ऐकत असतांना त्यांचे वय, त्यांचा विजनवास सारे काही पुसून गेले. गाणे संपताच अल्लादियाखांचे एक चाहते श्री. शिरगांवकर, प्रो. देवधर इ.चे टेलिफोन आले. या वेळेला त्यांचे मला पहिले दर्शन घडले. पायांत जोडे, धोतर, लांब कोट, उपरणे, उंचशी टोपी आणि हातात काठी या वेषात बाबा मोठे रुबाबदार दिसत. फार उंच नव्हते. तरी उंच भासत. नंतर एकदा लक्ष्मीबागेत त्यांचे गाणे झाले होते. भूर्जीखां, विलायत हुसेन इ. सर्व गवई लोकांचाच श्रोतृसमुदाय होता. गाणे छान झाले. बाबांची उंची दर गाण्याबरोबर वाढते आहे असा मला तेव्हा भास होई.

बाबांच्या रुबाबदार व्यक्तिमत्वाला एक कारण त्यांची खणखणीत तब्येत होय. बाबांच्या वयाचा व त्यांच्या उत्साहाचा, शक्तीचा मेळ बसत नसे. गावाबाहेर राहत, एकटेच. देवळाचे काम पाहत, पूजाअर्चा, स्वयंपाकही स्वतः पाहत. एकदा आकाशवाणीच्या कार्यक्रमासाठी बाबा औंधहून निघाले. गाडी रहिमतपूरला पकडावयाची पण त्यांची गाडी चुकली. बाबा तडक हमालाच्या डोक्यावर सामान देऊन तीन मैलांवर असलेल्या कोरेगावला चालत गेले आणि दुसरी गाडी पकडून पुण्याला आले. कार्यक्रम चुकविला नाही. बुवांचे १९४७ ला आकाशवाणीवरचे कार्यक्रम सुरु झाले तेव्हा ते जवळजवळ पासष्टी ओलांडून चालले होते ही गोष्ट लक्षात घेतली की बाबांच्या पदयात्रेचे कौतुक लक्षात येईल.

बाबांची हीच ताकद त्यांच्या गाण्यातही दिसे. आधीच ग्वाल्हेर गायकी पीळदार, कसदार. बाबांनी त्यात एकही तुकडा बाहेरचा येऊ न देण्याची खबरदारी घेतलेली! पण बाबा असे गात की नव्या दमाचे म्हणवणारे आम्ही मागे गाऊ लागलो तर आमचे गाणे कुठेतरी कोपऱ्यात चालले आहे असे वाटे.

बाबा कसाने गात तसे विलक्षण जिद्दीने गात. एका वर्षी उत्सवासाठी औंधला जमलो असता बाबांना गजाननबुवांनी असे सुचविले की आता बाबांनी रेडिओवर गाऊ नये. वृद्धापकालाचा नाही म्हटले तरी गाण्यावर परिणाम होतोच. बाबांना त्या सूचनेचा फार राग आला आणि पहाटे चार वाजता बाबा मालकंस, ललत व भैरवी असे गायले की रेडिओवर इतरांनी का गावे असा प्रश्न पडला.

बाबा मध्ये काही वर्षांपूर्वी औंधला बरेच आजारी होते. म्हणून आम्ही सगळे औंधला जमलो. त्यांच्या खोलीची साफसफाई करण्याचे काम हाती घेतले तेव्हा एका फडताळात नीट बांधून ठेवलेल्या बाबांच्या चीजांच्या चार मोठ्या वह्या मिळाल्या. कुतुहलाने पाहिले तर एक वही ध्रुपद-धमारांनी भरलेली. मी जरा बुचकळ्यातच पडलो. बाबांना मी नंतर विचारले तर बाबांच्या व्यासंगीपणाचा एक वेगळाच पैलू नजरेस पडला. "उत्तर हिंदुस्थानच्या दौऱ्यावर गेलो असता ध्रुपद गायकी व ब्रज भाषा यांचा अभ्यास वाढविणे जरूर असे पटले म्हणून तसा अभ्यास केला व त्याचे फलित म्हणजे ही वही" असे बाबांनी स्पष्टीकरण दिले. दमसास, लयीचे ज्ञान व स्वरस्थाने पक्की कळणे या दृष्टीने पाहता ध्रुपदे गायनाच्या विद्यार्थ्यांना प्रथम शिकविली पाहिजेत हे जुने मत त्यांनीही अगदी आग्रहाने मांडले. शिकविण्याबाबत तर बाबांचा हात धरणे मुश्किलच. विषय सुबोध करावा पण त्याचा कस कमी होऊ न देता. ही तारेवरची गुरुकसरत त्यांनीच करावी. बाबा एवढे रागीट, पण शिकविताना अगदी शांतिब्रह्म. एखादे वेळेस शिष्य कंटाळेल वा स्वत:वरच रागवेल पण बाबांच्यात काही फरक नाही.

पण एरवी मात्र फारच तापट. औंधला त्यांनी देवळाच्या आवारात छात्रालयाच्या उपयोगासाठी खोल्या बांधल्या आहेत. त्यांचा एक शिष्य, अगदी म्हातारपणी त्यांच्याजवळ कुणीतरी असावे म्हणून ठेवलेला, ह्या खोल्यांपैकी कुठल्यातरी लांबच्या खोलीत काम करत होता, त्याला बाबांनी हाक मारली. ती त्याला ऐकू गेली नाही. अर्थातच त्याने ओ दिली नाही. झाले! त्याची वळकटी, तांब्या, भांडे, कपडे सारे काही भराभर फेकले गेले आणि त्या शिष्याने हा अवतार पाहताच जी धूम ठोकली की सामान घ्यायलासुद्धा त्याने दुसरा माणूस पाठविला!

बाबांच्या स्वभावात एकेक मौजाच होत्या. स्वयंपाकपाणी स्वत: करीत. तेव्हा तूप, दूध अगदी मोजके मागविले जाई व वापरातही तोच मोजकेपणा. तामलीला तुपाची एक कणी असली तरी ती संपल्याखेरीज नवीन तूप कढविले जायचे नाही. असे असता तामलीत तूप दिसूनही बाबा एक दिवस जेव्हा म्हणाले की तूप कढविले पाहिजे तेव्हा मी चकितच झालो. बाबा किंचित हसून म्हणाले, "अरे तुपाला वास येतोय. आणि बंड्याला वाशेळं तूप चालत नाही." हा बंड्या कोण माहित आहे? त्यांचा बोका! हा बोका अहिंसक होता. उंदीर मारण्याचे काम तो निषिद्ध समजे. तुपाला वास येताच मान किंचित फुगवून मागे घेई व योग्य ते खाणे समोर येईपर्यंत डोळे किलकिले करून बसे! खाऊन झाले की समोरच्या हौदावर ऊन खात बसे व आपल्या नजरेखाली नीट सारे चालले आहे या आविर्भावात आळोखेपिळोखे देई.

बाबांच्या व्यक्तिमत्त्वाचा आध्यात्मिक पैलू पाहिल्याशिवाय या स्मरणिकेची सांगता व्हावयाची नाही. बाबांची पत्नी गेल्यावर संसारातले त्यांचे लक्ष उडालेच. विद्यालय व एक मुलगा यांचा संसार त्यांनी विंचवाच्या बिऱ्हाडाप्रमाणे आज सांगली तर उद्या औंध, सातारा, वाई, महाबळेश्वर असा नाचविला. त्यांचे लक्ष पहिल्यापासून साधू दिसला की त्याचा सहवास करण्यावर. (गाण्याबरोबरच अध्यात्माचाही छंद बाबांना परंपरागतच. त्यांचे वडील मनोहरबुवा कीर्तन करीत व संत बलभीमबुवांच्या सहवासासाठी त्यांनी किन्हईला वास्तव्य केले होते.) शेवटी शिवानंदस्वामींचा त्यांनी उपदेश घेतला. स्वामींच्या सेवेत कधीही अंतर पडू दिले नाही. गुरुसमर्थ विद्यालय (हे बाबांच्या विद्यालयाचे नाव) मुंबईला असता एकदा सहज उतरण्यास आलेले स्वामी शेवटी औंधला बाबांच्याकडे जाऊन राहिले. त्यांच्या आजारपणात बाबांनी रात्र-अपरात्र पाहिली नाही. पडेल ती सेवा केली. स्वामी ब्रम्हस्वरूप झाल्यावर बाबांनी तिथे त्यांची समाधी व एक दत्तमंदिर बांधले. त्यांच्या निर्वाणदिनी एक उत्सवही सुरु केला, जो

आजतागायत चालू आहे. आलेला प्रत्येक कलावंत (आणि येथे हजेरी लावण्यात प्रत्येकाला धन्यता वाटते) म्हणतो की या स्थानात काहीतरी विशेष शांतता वाटते. बाबांच्या स्वामीभक्तिमुळे हा परिणाम झाला असे म्हटले असता वावगे ठरू नये इतकी त्यांची स्वामीभक्ति तीव्र होती.

मंगळवारी पावणेदहा वाजता बाबा निधन पावले. अखेरपर्यंत ते शुद्धीवर होते. आणि त्यांचे शेवटचे उद्गार म्हणजे 'स्वामीमहाराज की जय' असा त्यांनी केलेला जयघोष होता. नादब्रह्म व परब्रह्म दोन्हींची उपासना करणाऱ्याला यापेक्षा वेगळा, लौकिकातला पूर्णविराम शक्य नव्हता.

---